नि.फौ.ख. क्रमांक. ०८/२०२३
सरकार विरुध्द परमेश्वर व इतर
निशाणी क्रमांक –३९

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – उषाबाई रावसाहेब केंद्रे
वय -५० वर्षे, धंदा - शेती,
रा. रुध्दा , ता.अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे</u>**

**०१.** मी आरोपीला ओळखते. आरोपी न्यायालयात हजर आहे. घटना दिनांक १४/१२/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता आमचे शेतात झाली होती. घटनेच्या दिवशी आरोपी आमचे शेतात आला. त्याने माझेकडे पाणी मागितले. मी त्याला पाणी दिले. त्यानंतर आरोपींने शेंगदाणे मागितले, व आरोपी आखाडयावर बसला. मी जेवत असतांना आरोपीला मी जेवणार का असे म्हणाले. आरोपी नाही म्हणाला. त्यानंतर आरोपींने माझे ताटातील भाकरी घेतली व खाण्यास लागला. म्हणून माझा मुलगा समाधान आरोपीला म्हणाला की, तुला जेवायचे नाही मग तु ताटातील भाकरी का घेतली. व त्याला बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर आरोपी शिव्या देवू लागला. आरोपींने खो-याने माझे मुलाचे कपाळावर मारले. त्यामुळे मुलाचे डोक्यातून रक्त येवू लागले. मी सोडवण्यास गेले असता आरोपींने मला ढकलून दिले. त्यामुळे माझे गुडघ्यास मार लागला या घटनेत माझी गळयातील पोत तुटून पडली. आरोपी म्हणाला की, मी गुंड आहे माझेकडे हत्यार आहे. आरोपींने जिवे मारण्याची धमकी दिली. जप्त खोरे मला दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला जप्त खोरे वस्तु १ दाखविले यास खो-याने आरोपीने माझे मुलाला मारले होते.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीं तर्फे उलटतपास वकील श्री. व्ही.ए. सोनकांबळे यांच्यामार्फत सुरु:-</u>**

**२.** मी पोलीसांना जबाब देतांना शेतातील गट नं. सांगितले नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपीचे शेत एकमेकांना लागून आहे. आमचे शेताच्या चतुसिमा: पुढील प्रमाणे आहेत. पर्वेला - बापु आमुले यांचे शेत आहे. पश्चिमेला - बालाजी केंदे यांचे शेत. दक्षिणेला - देविदास केंद्रे यांचे शेत. उत्तरेला - अशोक केंद्रे यांचे शेत आहे. घटनेच्या वेळी शेजारचे लोक हजर नव्हते. आज रोजी फिर्यादी माझा मुलगा मयत आहे. हे म्हणणे खरे आहे

की, माझे मुलाला दारुचे व्यसन होते. आरोपींने शेंगदाणे मागितले, व आरोपी आखाडयावर बसला. मी जेवत असतांना आरोपीला मी जेवणार का असे म्हणाले. आरोपी नाही म्हणाला. त्यानंतर आरोपींने माझे ताटातील भाकरी घेतली व खाण्यास लागला. हा मजकुर पोलीसांनी नोंदविलेल्या जबाबात नमुद नाही तो मजकुर का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींने माझे ताटातील भाकरी घेतली त्यामुळे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे शेत एकाच शिवारात आहे. हे म्हणणे खरे आहे की, जप्त खोरे आमचे आखाडयावरील आहे. हे खोरे मी पोलीसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतेही घटना झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींने खो-याने माझे मुलाचे कपाळावर मारले. त्यामुळे मुलाचे डोक्यातून रक्त येवू लागले. मी सोडवण्यास गेले असता आरोपींने मला ढकलून दिले. त्यामुळे माझे गुडघ्यास मार लागला या घटनेत माझी गळयातील पोत तुटून पडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून पैसे काढण्यासाठी खोटी तक्रार दिली व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही. श्रवणोत्तर स्वीकृत,

**( आर.डी. वाबळे )**
दिनांक -०३.११.२०२५ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.